## महाराष्ट्र शासन

**तात्काळ /कालमर्यादा /ई-मेल** क्रमांक : एसएलएस-२०१९/प्र.क्र.३१२/२०१९/आ(वर्ग-२),

E Mail- doesttclass२.wrd@maharashtra.gov.in जलसंपदा विभाग,
दूरध्वनी क्र. ०२२-२२७९४१४५ हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : ३० डिसेंबर २०१९.

**प्रति,**

जलसंपदा विभागातील सर्व महासंचालक,
सर्व कार्यकारी संचालक, जलसंपदा विभाग,
सर्व मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग,
अधीक्षक अभियंता, पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे.
अधीक्षक अभियंता, कृष्णा पाणी तंटा लवाद, विशेष कक्ष, पुणे.
अधीक्षक अभियंता, दक्षता पथक (परिमंडळे), ठाणे/पुणे/औरंगाबाद/नागपूर/अमरावती.

**विषय :-** कनिष्ठ अभियंता (शाखा अभियंता)(स्थापत्य) या संवर्गातील अभियंत्यांना उपविभागीय अधिकारी (स्थापत्य) पदावर पदोन्नती देणेबाबत.
सन २०१९-२०२० ची निवडसूची.

उपविभागीय अधिकारी (स्थापत्य) संवर्गातील पदोन्नती कोट्यातील रिक्त पदांवरील पदोन्नतीसाठी कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता (स्थापत्य) या निम्न संवर्गातील पात्र अभियंत्यांची सन २०१९-२० ची निवडसूची तयार करण्याचे शासन स्तरावर प्रस्तावित आहे. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दिनांक २५.०५.२००४ नुसार पदोन्नतीमध्ये लागु केलेले आरक्षण मा. उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक २७९७/२०१५ मधील दिनांक ०४.०८.२०१७ च्या निर्णयान्वये रद्द ठरविले आहे. सदर निर्णया विरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल विशेष अनुज्ञा याचिका (SLP) क्रमांक २८३०६/२०१७ प्रलंबित आहे. सबब, सध्या पदोन्नती कोट्यातील रिक्त पदे सामान्य प्रशासन विभाग/का-१६(ब) च्या दिनांक २९.१२.२०१७ च्या पत्रातील सुचनेनुसार सेवाज्येष्ठतेने खुल्या प्रवर्गातून भरण्यात येत आहेत.

सदर पार्श्वभूमीवर कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) संवर्गाच शासन परिपत्रक, जलसंपदा विभाग, क्रमांक : ज्येष्ठता १४१९/प्र.क्र. ३९७/२०१९/आ (तांत्रिक), दिनांक १६ डिसेंबर, २०१९ अन्वये दि.१५.११.१९७६ ते दि.३१.१२.२०१३ या कालावधीच्या प्रसिध्द अंतिम ज्येष्ठतासूचीतील ज्येष्ठता क्रमांक ८९१८ ते ९७०० पर्यंतच्या कनिष्ठ अभियंता (शाखा अभियंता) (स्थापत्य) यांची पदोन्नतीच्या अनुषंगाने माहिती (तत्कालीन ज्येष्ठतासूचीतील ज्येष्ठता क्रमांक ८९१७ पर्यंतची नावे वगळून) सोबत जोडलेल्या प्रपत्र "अ" मध्ये खालील तपशिलासह उपलब्ध करुन द्यावी.

I) सन २०१४-२०१५ ते २०१८-२०१९ या लगतच्या ५ वर्षातील मूळ (नसल्यास दुय्यम) गोपनीय अहवाल (एखाद्या वर्षातील गोपनीय अहवाल नसल्यास त्यामागील वर्षातील गोपनीय अहवाल ), सेवापुस्तकातील पहिल्या पानाची साक्षांकीत प्रत,

II) व्यावसायिक परीक्षा, संगणक परीक्षा, मराठी व हिंदी भाषा उत्तीर्ण असल्याची किंवा त्यातून सूट देण्यात आलेल्या आदेशाची प्रत

III) परिविक्षाधीन कालावधी पूर्ण आदेशाची प्रत

IV) स्थायी आदेशाची प्रत

V) सन २०१८-२०१९ अखेर मत्ता व दायित्व सादर केल्याची माहिती.

सदर माहिती सादर करतांना यापूर्वी उक्त ज्येष्ठतासुचीतील सेवाज्येष्ठ कनिष्ठ अभियंता/शाखा अभियंता पदोन्नतीतून वगळले गेले असल्यास त्यांच्याही ज्येष्ठता क्रमांकासह वरील माहिती समावेश करावा.

२. मागासप्रवर्गातील उमेदवारांच्या बाबतीत (अज/अजा/विजाभज/विमाप्र) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत सादर करावी.

तसेच अ.ज. प्रवर्गातील उमेदवारांचे बाबतीत संबंधीतांचे अ.ज. प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र यापूर्वी अवैध ठरले असल्यास त्यांना वि.मा.प्र. मधून सेवा संरक्षण देण्यात आले आहे का ? असल्यास शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्र.बीसीसी २०१८/प्र.क्र.३०८/१६-ब, दिनांक २१.१२.२०१९ नुसार त्यांना अधिसंख्य पदावर वर्ग करण्याचे प्रस्तावित आहे किंवा कसे ? ह्याबाबत कागदपत्रासह स्पष्ट अभिप्राय नमूद करावेत.

इतर मागास प्रवर्गातील अभियंत्यांच्या बाबतीत त्यांची प्रथम नियुक्ती कोणत्या प्रवर्गातून (खुला/ इमाव) झालेली आहे, याचा स्पष्ट उल्लेख करावा. प्रथम नियुक्ती इ.मा.व. प्रवर्गातून झाली असल्यास अशा अभियंत्यांचे जात प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्राची छायांकित सत्यप्रत पाठविण्यात यावी. मागास प्रवर्गातील अभियंत्यांच्या वरील कागदपत्रांच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन पाठवाव्यात. मूळ कागदपत्र पाठविण्यात येऊ नये.

३. ज्येष्ठतेने पदोन्नती विचारक्षेत्रात समाविष्ट होणाऱ्या अभियंत्यांपैकी जे अभियंते सध्या सेवेत नसतील त्यांच्याबाबत ते कोणत्या कारणाने (उदा.मृत्यू/ स्वेच्छानिवृत्ती/राजीनामा इ.) सेवेत नाहीत याची माहिती दिनांकासह न चुकता द्यावी. तसेच सदर अभियंता अर्हतारहित असल्यास स्पष्ट नमूद करावे.

४. ज्या कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता यांनी जलसंधारण विभागामध्ये समावेश करण्याचा विकल्प दिलेला आहे व जलसंधारण विभागाने दि.१८.०९.२०१८ रोजी प्रसिध्द केलेल्या ज्येष्ठता यादीमध्ये त्यांची नावे समाविष्ट आहेत. अशा अभियंता यांचे गोपनीय अहवाल पदोन्नती करीता पाठविण्यात येवू नयेत. तथापि, सोबतच्या प्रपत्र-अ मधील टिप क्र. ४ मध्ये यासंबंधी स्पष्ट वस्तुस्थिती नमूद करावी.

५.	ज्या अभियंत्यांची माहिती उपलब्ध होणार नाही आणि पदोन्नती आदेश निर्गमित झाल्यानंतर संबंधित अभियंते आपल्या अधिनस्त कार्यरत असल्याचे निदर्शनास आल्यास असे अभियंते पदोन्नतीपासून वंचित राहिल्याबाबत आपणांस जबाबदार धरण्यात येईल.

६.	महासंचालक ,कार्यकारी संचालक, मुख्य अभियंता यांनी माहिती संकलित करुन एकत्रित सादर करावी. अधीक्षक अभियंता यांनी थेट माहिती पाठवू नये. शासनाच्या थेट नियंत्रणाखालील अधीक्षक अभियंत्यांनी सदर माहिती थेट शासनास सादर करावी.

७.	सदर अभियंत्याच्या विभागीय चौकशीची अद्ययावत माहिती द्यावी. त्याचप्रमाणे माहिती दिल्यानंतर या माहितीत काही बदल झाल्यास तो तात्काळ शासनास अवगत करावा. तसेच आपण दिलेल्या माहिती व्यतिरिक्त इतर अभियंते आपल्या अधिपत्याखाली कार्यरत नसल्याचे प्रमाणपत्र सोबतच्या प्रपत्र "ब" मध्ये दयावे. आपण माहिती देत असताना सेवापुस्तकानुसार या अभियंत्यांची मराठीमध्ये संपूर्ण नावे द्यावीत.

८.	सदर माहिती सोबत जोडलेल्या विवरणपत्रामध्ये नमूद रकान्याप्रमाणे MS-Excel मध्ये Sakal Marathi या फॉन्टमध्ये माहिती टंकलिखित करुन सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपीसह वेळापत्रकाप्रमाणे संबंधित कार्यालयाच्या विशेष अधीक्षक / अधीक्षक / वरिष्ठ लिपिक यांनी व्यक्तिश: माहिती घेऊन यावे. ज्या कार्यालयांची माहिती याप्रमाणे प्राप्त होणार नाही, त्यांची माहिती मा. सचिव (लाक्षेवि) यांच्या निदर्शनास आणण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**सोबत:- प्रपत्र “अ” व “ब”.**

(रणजित शि. अहिरे)
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

कार्यासन आ. (वर्ग-२) संग्रहार्थ.

शासन पत्र क्रमांक : एसएलएस २०१९/प्र.क्र.३१२/२०१९/आ.(वर्ग-२) दिनांक : ३० डिसेंबर, २०१९ चे सहपत्र

प्रपत्र "अ"

| अ.क्र | ज्येष्ठता क्रमांक | अधिका-याचे नाव (मराठीत संपूर्ण नाव द्यावे - आद्याक्षरे देऊ नयेत.) | जन्म दिनांक (दिनांक DD-MM-YYYY या नमुन्यात द्यावा.) | सेवा निवृत्तीचा दिनांक | कनिष्ठ अभियंता पदावरील नियुक्तीचा दिनांक | शैक्षणिक पात्रता | जात प्रवर्ग | जात प्रमाणपत्राची वैधता झाली आहे किंवा कसे | महाराष्ट्रातील मूळ निवासी आहेत किंवा कसे, (सेवापुस्तका- वरुन मूळ गाव तपासावे) | मलोआ ची व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण आहेत किंवा कसे | व्यावसायिक परीक्षा उत्तीर्ण आहेत काय, असल्यास दिनांक | स्थायित्व प्रमाणपत्र निर्गमित केल्याचा क्रमांक व दिनांक | संगणक परीक्षा उत्तीर्ण आहे काय? असल्यास दिनांक / सुट दिली असल्यास त्याचा दिनांक | विभागीय चौकशी चालू/ प्रस्तावित आहे किंवा कसे ? असल्यास दोषारोप पत्राची प्रत उपलब्ध करुन द्यावी. | सदर अधिकाऱ्याचे ५०/५५ वर्षाचे पुनर्विलोकन झाले आहे काय ? | सन २०१४-१५ ते २०१८-१९ या कालावधीच्या गोपनीय अहवालातील प्रतिकूल शेरे कळविण्यात आले आहेत काय, असल्यास त्याची प्रत द्यावी. | दिनांक ३१ मार्च, २०१९ अखेरचे मत्ता व दायित्व प्रमाणपत्र सादर केले आहे किंवा कसे? | अधिकारी स्वत: अपंग आहे काय? असल्यास त्याबाबतचा पुरावा सादर करावा. | अधिकाऱ्याचा जोडीदार किंवा त्यांचे मूल मतिमंद आहे का? असल्यास त्याबाबतचा पुरावा सादर करावा. | स्त्री अधिकारी असल्यास विधवा किंवा परित्यक्त्या आहेत किंवा कसे? असल्यास त्याबाबतचा पुरावा सादर करावा. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

महत्त्वाची टिप :-

(१) सन २०१४-२०१५ ते २०१८-२०१९ या कालावधीचे मूळ गोपनीय अहवाल पाठवावेत. मूळ नसतील तर दुय्यम गोपनीय अहवाल पाठवावेत. अर्धवट गोपनीय अहवाल पाठवू नयेत. मागणी केलेल्या वर्षाव्यतिरिक्त जादा गोपनीय अहवाल पाठवू नयेत. प्रत्येक गोपनीय अहवालाच्या मुखपृष्ठावर संबंधित कार्यालयाचे नाव व ज्येष्ठता क्रमांक नमूद करावे.

(२) मागास प्रवर्गातील अधिकाऱ्यांचे मूळ जात प्रमाणपत्र व मूळ जात वैधता प्रमाणपत्राची प्रत्येकी एक जादा प्रमाणित झेरॉक्स प्रतीसह पाठवावी. तसेच सेवापुस्तकाच्या पहिल्या पानाची व जात वैधतेबाबतची नोंद असलेल्या पानाची छायाप्रत प्रमाणित करुन पाठवावी.

(३) कनिष्ठ अभियंता संवर्गाच्या अंतिमरित्या प्रसिध्द ज्येष्ठता यादीतील नोंद व कार्यालयांतर्गत कार्यरत अधिकाऱ्यांचे नांव, जात प्रवर्ग व इतर तपशिल यात काही फरक असल्यास त्याबाबतचा स्पष्ट उल्लेख माहितीमध्ये करावा.

(४) विवरणपत्रात नमूद असलेल्या अ.क्र. ---- वरील अभियंत्यांने मृद व जलसंधारण विभागाकडे समावेश होण्याचा विकल्प दिलेला आहे. मृद व जलसंधारण विभागाने दि.२२.०९.२०१७ व दि.०७.०६.२०१८ रोजी प्रसिध्द केलेल्या यादीमध्ये अ.क्र. --- -- वर नावाचा समावेश आहे. अथवा दि.१८.०९.२०१८ रोजी प्रसिध्द केलेल्या ज्येष्ठता यादीमध्ये अ.क्र.----- वर अभियंता यांच्या नावाचा समावेश आहे.

**प्रपत्र -"ब"**

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, शासन पत्र क्रमांक एसएलएस २०१९/प्र.क्र.३१२/२०१९/आ(वर्ग-२), दिनांक डिसेंबर, २०१९ अन्वये मागविण्यात आलेल्या माहिती कनिष्ठ अभियंता (शाखा अभियंता) (स्थापत्य) संवर्गाच्या दिनांक १६.१२.२०१९ रोजीच्या ज्येष्ठतासूचीतील सेवाज्येष्ठता क्रमांक ८९१८ ते ९७०० मधील या कार्यालयांतर्गत कार्यरत सर्व कनिष्ठ अभियंता (शाखा अभियंता) (स्थापत्य) यांची माहिती सोबत पत्र क्रमांक ................, दिनांक --/---/२०२० अन्वये सादर करण्यात आली आहे. हे अभियंते वगळता अन्य कोणताही अभियंता प्रदेश कार्यालयांतर्गत कार्यरत नाही.

तसेच सोबतच्या अभियंत्याची माहिती कार्यालयीन सेवा अभिलेखावरुन तपासली असून ती अचूक व योग्य आहे.

नाव /सही:-

**स्थळ:-**

**दिनांक :-**

शासन पत्र क्रमांक : एसएलएस २०१९/प्र.क्र.३१२/२०१९/आ.(वर्ग-२) दिनांक : ३० डिसेंबर, २०१९ चे सहपत्र - वेळापत्रक

खालील तक्त्यात नमूद केलेल्या वेळेप्रमाणे सर्व कार्यालयांनी माहिती व सन २०१४-१५ ते सन २०१८-१९ या कालावधीचे गोपनीय अहवाल घेऊन पत्रात नमूद पत्त्यावर विहित दिवशी व वेळेत उपस्थित रहावे.

| अ. क्र. | कार्यालयाचे नांव | माहिती शासनास पाठविण्याचा दिनांक व वार | वेळ | अ.क्र. | कार्यालयाचे नांव | माहिती शासनास पाठविण्याचा दिनांक व वार | वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **महासंचालक, संकल्पन, प्रशिक्षण, जलविज्ञान, संशोधन व सुरक्षितता, नाशिक** | १५ जानेवारी, २०२० बुधवार | सकाळी १०.३० ते दुपारी ०१.३० | ५ | **मुख्य लेखा परीक्षक, जल व सिंचन, महाराष्ट्र राज्य, औरंगाबाद** | १८ जानेवारी, २०२० शनिवार | |
| | मुख्य अभियंता, मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक | | | ६ | **कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव** | | सकाळी १०.३० ते ११.३० |
| | अधीक्षक अभियंता व संचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक | | | | मुख्य अभियंता, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव | | |
| | अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक | | | ७ | **कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे** | २० जानेवारी, २०२० | सकाळी १०.३० ते ११.३० |
| | मुख्य अभियंता, नियोजन व जलविज्ञान, नाशिक | | | | मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, पुणे | | |
| २ | **कार्यकारी संचालयक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद** | १६ जानेवारी, २०२० गुरुवार | सकाळी १०.३० ते दुपारी ०१.३० | | मुख्य अभियंता (विप्र), जलसंपदा विभाग, पुणे | | |
| | मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, औरंगाबाद | | | | मुख्य अभियंता (स्था), जलविद्युत प्रकल्प व गुण नियंत्रण, पुणे | | |
| | मुख्य अभियंता, लाभक्षेत्र विकास, जलसंपदा विभाग, औरंगाबाद | | | ८ | **कार्यकारी संचालक, कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे** | २१ जानेवारी, २०२० मंगळवार | दुपारी १२.३० ते २.०० |
| | मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिक | | | | मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, कोंकण प्रदेश, मुंबई | | |
| ३ | **कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर** | | | ९ | **अधीक्षक अभियंता, पाटबंधारे संशोधन विकास संचलनालय, पुणे** | | |
| | मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, नागपूर | १६ जानेवारी, २०२० शुक्रवार | सकाळी १०.३० ते दुपारी ०१.३० | १० | **अधीक्षक अभियंता, कृष्णा पाणी तंटा लवाद विशेष कक्ष, पुणे** | | दुपारी ०२.०० ते ०३.०० |
| | मुख्य अभियंता, गोसीखुर्द प्रकल्प, जलसंपदा विभाग, नागपूर | | | ११ | अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, पुणे परिमंडळ, पाटबंधारे विभाग, पुणे | २२ जानेवारी, २०२० | |
| | मुख्य अभियंता (जसं), जलसंपदा विभाग, अमरावती | | | १२ | अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, मुंबई परिमंडळ, पाटबंधारे विभाग, ठाणे | | दुपारी ०३.०० ते ०३.३० |
| | मुख्य अभियंता (विप्र), जलसंपदा विभाग, अमरावती | | | १३ | अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, औरंगाबाद परिमंडळ, औरंगाबाद | | दुपारी ०३.३० ते ०४.०० |
| ४ | **आयुक्त, मृद व जलसंधारण (म.रा.), वाल्मी, औरंगाबाद.** | | | १४ | अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, अमरावती परिमंडळ, जलसंपदा विभाग, अमरावती | | दुपारी ०४.०० ते ०४.३० |
| | अप्पर आयुक्त जलसंधारण तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, पुणे | | | १५ | अधीक्षक अभियंता, दक्षता पथक, नागपूर परिमंडळ, जलसंपदा विभाग, नागपूर | | |